महाराष्ट्र शासन
कृषि विभाग

दूरध्वनी क्र. ०२०-२५५१२८११
E-mail ID : courtbranchestt3@gmail.com

साखर संकुल, नरवीर तानाजी वाडी,
शिवाजी नगर, पुणे – ४११ ००५.

---

**जा.क्र. कृआ/प.आ.सुआबं/विधी अ./प्र.क्र./आस्था-१,/ २३२२५ .** **दिनांक : २० जुलै, २०२१.**

**विषय :-** कृषि आयुक्तालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांसाठी एका विधी अधिकाऱ्याची नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर बाह्य यंत्रणेद्वारे भरणे बाबत.

**महोदय,**

कृषि आयुक्तालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांसाठी एका विधी अधिकाऱ्याची नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर बाह्य यंत्रणेद्वारे करणेचे अनुषंगाने निविदा मागविणेसाठी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करावयाची असून त्यासाठी खालील दस्तावेज सोबत संलग्न करण्यात येत असून आपले शाखेचे ई-मेलद्वारे पीडीएफ स्वरुपात देखील पाठविण्यात येत आहेत..

१) मा. आयुक्त कृषि यांची मान्यता असलेली व स्वाक्षरीची जाहिरात,
२) विभाग प्रमुख / अधिकारी यांचे प्रमाणपत्र,
३) कंत्राटी विधी अधिकाऱ्यांची शैक्षणीक अर्हता व अनुभव, कर्तव्य व जबाबदाऱ्या, अटी व शर्ती, व
४) Website updation form.

यास्तव, एका विधी अधिकाऱ्याची नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर बाह्य यंत्रणेद्वारे करणेचे अनुषंगाने निविदा मागविणेसाठी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्याची कार्यवाही आपले स्तवरुन तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत या शाखेस अवगत करण्यात यावे, हि विनंती.

<u>सोबत</u> :- वरील प्रमाणे.
**मा. संचालक (फलोत्पादन) यांचे मान्यतेने.**

20/7/21

**(अशोक बाजीराव गिरवले)**
**प्रशासकीय अधिकारी**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे – ४११ ००५.**

**प्रति,**
**कृषि उपसंचालक (संगणक प्रकल्प)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे – ४११ ००५.**

# जाहिरातीचा नमुना

महाराष्ट्र शासन कृषि विभाग,

जाहिरात क्र.कृआ/विअ/कंभ/आस्था-३/ दिनांक २० /०७/२०२१ २०।७।२१

कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ००५.

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -५ यांचे कार्यालयातील आस्थापना विभागात विधी अधिकारी १ पद बाहय यंत्रणेद्वारा कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांच्या करारावर भरावयाचे आहे. प्रस्तुत पदभरतीसाठी आपले मनुष्यबळ पुरवठा संस्थेकडून आवश्यक तांत्रिक व आर्थिक लिफाफयामध्ये निविदा दि.२८/०७/२०२१ पर्यंत कृषि सहसंचालक (आस्था.), कृषि आयुक्तालय,म.राज्य, पुणे -५ या पत्त्यावर समक्ष अथवा पोस्टाने पाठविण्यात याव्यात.दि.२८/०७/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

| अ. क्र. | कंत्राटी पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता,अनुभव व पात्रता | प्रतिमहा एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी | १ | उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा. विविध न्यायालयातील वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. सेवाविषयक व प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या आस्थापना विषयक सर्व बाबींचे न्यायालयीन प्रकरणांचे परिपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवारास मराठी, हिंदी, व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. उमेदवारास संगणक हाताळणी व वापरण्याबाबतचे ज्ञान असावे. विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | मानधन रु.४०,००० अधिक प्रवासखर्च दरमहा |

इच्छुक बाहय मनुष्यबळ पुरवठा संस्थेने विहीत कालावधीत आपल्या निविदा सादर कराव्यात. निविदा २ बंद लिफाफयामध्ये सादर कराव्यात. बंद पाकिटावर " कंत्राटी विधी अधिकारी " पदासाठी असे स्पष्ट नमूद करण्यात यावे.(एका पाकिटावर तांत्रिक लिफाफा व दुसऱ्या पाकिटावर आर्थिक/दर लिफाफा) शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये,जबाबदाऱ्या आणि अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

प्राप्त निविदा दि. २९/०७/२०२१ रोजी वेळ ~~दुपारी~~ १.०० वाजता ठिकाण वरील पत्त्यावर ~~येथे~~ उघडण्यात येतील.

आयुक्त कृषि,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००१.

२३५१५
२५३१५

# बाहय यंत्रणेमार्फत कंत्राटी विधी अधिकारी नेमणुकीसाठीचे निकष

## अ)शैक्षणिक अर्हता व अनुभव -

1) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व सनदधारक असावा.
2) विधी अधिकारी पदासाठी जिल्हा स्तरावरील विविध न्यायालये अथवा मा.उच्च न्यायालय (सर्व) अथवा मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (सर्व) येथील वकीली व्यवसायाचा किमान 5 वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.
3) उमेदवार सेवाविषयक व प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असावा, ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4) उमेदवारास मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.
5) उमेदवारास संगणक हाताळणे व वापरण्याबाबतचे ज्ञान असावे.
6) विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी 45 वर्षांपेक्षा जास्त नसावे.

## ब) कर्तव्ये व जबाबदाऱ्या –

1) नेमणूक दिलेल्या कार्यक्षेत्रात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी परिपूर्ण कामकाज पहाणे,परिच्छेद निहाय अभिप्राय तयार करणे,तपासणे व मान्यतेस सादर करणे.न्यायालयीन प्रकरणी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रस्तावित करणे.
2) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणे तपासणे व ती प्रकरणे हाताळणे.
3) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे ,अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे व ते समय मर्यादेत दाखल होतील याची दक्षता घेणे.
4) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्या सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवून संबंधित न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पहाणे.
5) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये संबंधित सरकारी वकीलांचे मत प्राप्त करणे व न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित वकीलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
7) अवमान याचिकेच्या अनुषंगाने शपथपत्र तयार करणे व विधी व न्यायविभागामार्फत प्रतिवादीतर्फे शासनाची बाजू मांडणे.
8)औद्योगिक न्यायालये, कामगार न्यायालये व ग्राहक तक्रार निवारण मंच येथील दावे शासनाच्या वतीने चालविणे.
9) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेली कार्ये विहीत मुदतीत पार पाडणे.
10) आपले कार्यक्षेत्रातील सर्व न्यायालय स्तरावर आपण त्या महिन्यात पाहिलेल्या कामकाजाचा दैनंदिन स्वरुपात मासिक अहवाल दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत आयुक्तालयास सादर करणे.
11) नेमून दिलेल्या कार्यालयात दररोज (शासकीय सुटटया वगळून)उपस्थित रहाणे आवश्यक राहील.

~~२३५५~~
२५५१५

## क)अटी व शर्ती –

1) मा.आयुक्त कृषि यांना विशेष परिस्थितीत कोणत्याहि वेळी विधी अधिकाऱ्याची सेवा समाप्त करण्याचा अधिकारी राहील.

2) सदर विधी अधिकाऱ्यास शासनाच्या तसेच कृषि विभागाच्या विरोधातील कोणत्याहि प्रकरणामध्ये सहभाग घेता येणार नाही. तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

3) नियुक्त झालेल्या विधी अधिकाऱ्याने त्यांना नेमून दिलेली कामे समाधानकारकरित्या पार न पाडल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

4) जेंव्हा न्यायालय विचारेल तेंव्हा विविध न्यायालये/शहराच्या बाहेरील खटल्यातील प्रकरणामध्ये लिखित स्वरुपात आणि लिखित स्वरुपाच्या टिपण्या तयार करण्यास मदत करेल.

5) विभाग आणि/किंवा त्याचे अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही प्रकरणे निश्चित केल्यावर अपील करण्यासाठी सल्ला मसलत करुन मत विचारात घेतले जाईल.

6) विधी अधिकारी विभागाला कायदेशीर मत देईल आणि जेव्हा जेव्हा विचारेल तेव्हा विभागाच्या वतीने कायदेशीर नोटीशीचे उत्तर तयार करेल.

7) सल्ला मसलत, वेळोवेळी प्रकरणात महत्वपूर्ण घटनांबददल विभागास माहिती दिली पाहीजे, विशेषत: मसुदा तयार करणे, कागदपत्र दाखल करणे, प्रकरणाची सुनावणी करण्याची तारीख, निर्णयाची प्रतिलिपी इ. देणे.

   विधी अधिकाऱ्यांस देण्यात येणारे मानधन आयुक्तालय स्तरावर कार्यालयीन खर्चातून देण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. बाहय यंत्रणेद्वारे नेमण्यात आलेल्या विधी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा अंतीम निर्णय मा.आयुक्त कृषि यांचा राहील.

8) कंत्राटी विधी अधिकाऱ्यांची नेमणूक 11 महिन्यांसाठी असेल.

9) कंत्राटी विधी अधिकारी हे कायमपणाचे फायदे मिळविण्यासाठी कोणत्याहि न्यायालयात जाऊ शकणार नाहीत.